सं.फौ.ख.क्र.१०३५/२०२५

सरकार –वि– रूधीर, नि.क्र.०७

**<u>सरकार तर्फे साक्षीदार क्रमांक ०१ यांची जबानी</u>**

मी याद्वारे प्रतिज्ञापूर्वक निवेदन करतो कीः–

माझे नाव — राजकुमार ताराचंदजी हेडावु

वय. ५० वर्षे, व्यवसाय — मजुरी,

राह. – दत्तात्रय नगर, तुमसर, ता. तुमसर, जिल्हा – भंडारा.

**<u>सरतपासणी सरकार तर्फे श्री. पी.आर. भलावी सहा. सरकारी वकील यांच्या मार्फत –</u>**

पोलिसांनी माझे समक्ष कोणतीही कार्यवाही केली नाही. पोलिसांनी मला सुचनापत्र दिले नव्हते. आता मला सुचनापत्र दाखविण्यात आले. त्यावर माझी सही आहे. परंतु त्यातील मजकुराबाबत मला काही माहिती नाही. सहीस ओळखीसाठी **निशाणी ८** देण्यात येते. मी घटनास्थळी गेलो नव्हतो. माझेसमक्ष पंचनामा करण्यात आला नव्हता. आता मला अभिलेखावरील पंचनामे दाखविण्यात आले. त्यावर माझी सही आहे. परंतु त्यातील मजकुराबाबत मला काही माहिती नाही. सहीस ओळखीसाठी **निशाणी ९ व १०** देण्यात येते. त्याचप्रमाणे आता मला राजधानी मटक्याचे आकडे लिहीलेली चिठ्ठी दाखविण्यात आली. त्यावर माझी सही आहे. त्यातील मजकुराबाबत मला काही माहिती नाही. सहीस ओळखीसाठी **निशाणी ११** देण्यात येते.

**साक्षीदार अभियोग पक्षास सहाय्य करत नसल्यामुळे, सरकारी वकीलांनी सुचक प्रश्न विचारण्याची परवानगी मागीतली, परवानगी देण्यात आली.**

२. हे म्हणणे खरे नाही की, दिनांक १८.०७.२०२५ रोजी पोलिसांनी मला सुचनापत्र देवुन मौजे आंबेडकर वार्ड येथे बौध्द विहारच्या बाजुला पंचनाम्याच्या कार्यवाहीसाठी बोलविले होते. हे म्हणणे खरे नाही की, त्यानंतर मी पोलिसांसोबत घटनास्थळी गेलो असता तिथे एका पांढ–या रंगाच्या कागदावर आकडे लिहीलेले चिट्ठी, एक निळ्या शाईचा पेन व नगदी रक्कम रूपये १११०/– असे आरोपी क्र.१ च्या

ताब्यातुन जप्त केले होते. मी आरोपीला ओळखत नाही. हे म्हणणे खरे नाही की, मी आरोपीच्या सांगण्यानुसार आज खोटी साक्ष देत आहे.

**सरतपास पुर्ण.**

**उलटतपास आरोपीतर्फे विधीज्ञ श्री. वासनिक यांनी नाकारले.**

**फेरतपास काही नाही.**

| | |
|---|---|
| श्रवणोत्तर स्विकृत | माझे समक्ष |
| स्वा/- | स्वा/- |
| (आर.पी. बाठे) | (आर.पी. बाठे) |
| न्या.दं.प्र.वर्ग, तुमसर | न्या.दं.प्र.वर्ग, तुमसर |
| दि. १६.०७.२०२६ | दि. १६.०७.२०२६ |